# प्रसिध्दी पत्रक

**१) श्री. छबुलाल म्हातारजी अंभग, वय ५५ वर्ष व्यवसाय- नौकरी, पदनिर्देशीत अधिकारी, अतिरिक्त कार्यभार- अतिक्रमण विभाग प्रमुख, महानगर पालीका औरंगाबाद,**
**२)श्री. सचिन श्रीरंग दुबे वय ३२ वर्ष व्यवसाय - दुय्यम आवेक्षक (कंञाटी), औरंगाबाद हे ५०,०००/- रुपयाची लाच रक्कम स्विकारल्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळयात.**

| | | |
|---|---|---|
| आरोपीचे नांव हुद्दा व पत्ता | :- | १)श्री. छबुलाल म्हातारजी अंभग, वय ५५ वर्ष व्यवसाय- नौकरी, पदनिर्देशीत अधिकारी, अतिरिक्त कार्यभार- अतिक्रमण विभाग प्रमुख , महानगर पालीका औरंगाबाद,<br>२)श्री. सचिन श्रीरंग दुबे वय ३२ वर्ष व्यवसाय - दुय्यम आवेक्षक (कंञाटी) महानगर पालीका औरंगाबाद |
| गुन्हा घडला तारीख व ठिकाण | :- | दिनांक ०७/०९/२०१८ रोजी महानगरपालीका कार्यालय औरंगाबाद येथे |
| लाचेची रक्कम | :- | ५०,०००/- रुपये |
| लाच मागण्याचा हेतु | :- | जप्त केलेले बांधकाम साहित्य परत देण्यासाठी व सदर बांधकाम पुढे चालु राहु देण्यासाठी |

यातील तक्रारदार यांच्या मुलीने मनपा औरंगाबादची बांधकाम परवानगी न घेता शहानगर बीड बाय पास रोड येथे घराचे बांधकाम चालु केले होते. महानगरपालीका अतिक्रमण पथकातील विभाग प्रमुख श्री छबुलाल अंभग व दुय्यम आवेक्षक (कंञाटी) श्री सचिन दुबे यांनी सदर बांधकामाचे ठिकाणी येऊन बांधकामासाठी लागणारे साहित्य जप्त केले होते. जप्त केलेले साहित्य परत करण्यासाठी व सदरचे बांधकाम पुन्हा चालु करु देण्यासाठी यातील १) श्री. छबुलाल म्हातारजी अंभग, वय ५५ वर्ष व्यवसाय- नौकरी, पदनिर्देशीत अधिकारी, अतिरिक्त कार्यभार- अतिक्रमण विभाग प्रमुख, महानगर पालीका औरंगाबाद, २) श्री. सचिन श्रीरंग दुबे वय ३२ वर्ष व्यवसाय - दुय्यम आवेक्षक (कंञाटी), महानगरपालीका औरंगाबाद यांनी तक्रारदार यांच्याकडे ७५,०००/- रुपये लाचेची मागणी केली. तक्रारदार यांची लाच देण्याची इच्छा नसल्याने, त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,औरंगाबाद येथे तक्रार नोंदविली.

सदर तक्रारीचे अनुषंगाने दिनांक ०७/०९/२०१८ रोजी १) श्री. छबुलाल म्हातारजी अंभग, वय ५५ वर्ष व्यवसाय- नौकरी, पदनिर्देशीत अधिकारी, अतिरिक्त कार्यभार- अतिक्रमण विभाग प्रमुख, महानगर पालीका औरंगाबाद यांच्याकडे पंच साक्षीदारा समक्ष लाचेची मागणी बाबत पडताळणी केली असता, श्री. छबुलाल म्हातारजी अंभग यांनी तक्रारदार यांच्याकडे ७५,०००/- रुपयाची लाचेची मागणी करून तडजोडी अंती ५०,०००/- रुपये लाच रक्कम श्री. सचिन श्रीरंग दुबे वय ३२ वर्ष व्यवसाय - दुय्यम आवेक्षक (कंञाटी), महानगरपालीका औरंगाबाद यांचेकडे देण्याचे सांगितले. त्यावरुन आज दि.०७/०९/२०१८ रोजी लाचेचा सापळा आयोजीत करण्यात आला असता, विभाग प्रमुख श्री अंभग यांचे मागणी प्रमाणे दुय्यम आवेक्षक श्री. सचिन श्रीरंग दुबे यांनी पंच साक्षीदारा समक्ष तक्रारदार यांच्याकडुन ५०,०००/- रुपये लाचेची रक्कम अतिक्रमण विभाग कार्यालय महानगपालीका, औरंगाबाद येथे स्विकारल्यानंतर दोन्ही आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे.

**तक्रारदार यांच्याप्रमाणे नागरीकांनी भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद यांनी केले आहे.**

फोन क्रं. ०२४०-२३४४०५०, टोल फ्रि क्रं. १०६४
Mail ID :-१) dyspacbaurangabad@mahapolice.gov.in, २) dyspacbabad@gmail.com.

उप अधीक्षक कार्यालय, अँन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद
सत्यमेव जयते

नितीन देशमुख
पोलीस उप अधिक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो,औरंगाबाद